# प्रेसनोट

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/ २१९४ /२०२५** **पुणे दिनांक - १५/०३/२०२५**

पुणे शहर वाहतूक शाखेकडुन होळी व धुलीवंदन साजरा करताना पुणेकरांची सुरक्षा व शांतता अबाधित राखण्याच्या उद्देशाने केलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत एकुण ८५५२ वाहनांची तपासणी करून मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या ४०२ तळीरामांवर ड्रंक ॲण्ड ड्राईव्हची कारवाई करण्यात आली.

मा. पोलीस आयुक्त, श्री अमितेशकुमार, मा. सहा पोलीस आयुक्त, श्री रंजनकुमार शर्मा व मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री मनोज पाटिल यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे होळीचा सण आंनदी, सुरक्षित साजरा करता यावा याकरीता शहरातील बेशिस्त वाहन चालकांना लगाम घालण्यासाठी दिनांक १४/०३/२०२४ रोजी स्पेशल ड्राईव्ह अंतर्गत शहरामध्ये ९० ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती.

शहरामध्ये एकुण ३७ वाहतूक विभाग व संबंधित पोलीस स्टेशनकडून लावण्यात आलेल्या नाकांबदीमध्ये वाहतूक नियमांचे उल्लघन करणारे बेशीस्त वाहन चालकांवर ट्रिपल सिटी, रॉंग साईड, ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह, इत्यादी च्या कारवाई अतंर्गत ३८६ वाहने जप्त करून एकुण ६११८ केसेस करण्यात आल्या असुन एकुण ५०,९४,०००/- दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

### ❖ महत्वाच्या कारवाईचा तपशील

- **ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह – ४०२**
- **ट्रिपल सिट – ९२१**
- **रॉंग साईड – ८५२**

---------------------------------------

- **एकुण केसेस :- ६११८**
- **एकुण दंडात्मक रक्कम :- ५०,९४,०००/-**

**( अमोल झेंडे )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर

**प्रत:- सर्व संबंधीतांना**